MHKO070011572022

## <u>नियमीत दिवाणी दावा क्र.१७५/२०२२ मधील नि.क्र.१८ खालील आदेश</u>

## (राजश्री राजेंद्र चौगुले –विरुध्द– श्रीमती द्रोपदी बाळकृष्ण पाटील वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ यांनी दि.२४/११/२०२२ रोजी प्रस्तुत प्रतिवादी विरुध्द झालेला 'विना कैफियत व म्हणणे' हा आदेश रद्दबातल करुन लेखी कैफीयत व म्हणणे दाखल करून घेण्यासाठी केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रतिवादी यांनी कैफियत मुदतीत न दिल्याने दि.२४/११/२०२२ रोजी त्यांच्याविरुध्द नो डब्ल्यु एस चा हुकूम झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांचे वय झाले असून त्या आजारी असतात. तसेच प्रतिवादी क्र.२, ४, ५ हे अडाणी अशिक्षीत असून त्यांना मुदतीत कैफियत दयावी लागते याचे ज्ञान नसल्याने वकीलांना मुदतीत वेळेत भेटून कैफियत देता आली नाही. कैफियत मुदतीत न देण्यामागे प्रतिवादी यांचा कोणताही गैरहेतू नव्हता व नाही. दावा स्थावर मिळकतीसंदर्भातील असल्याने त्यामध्ये प्रतिवादी यांचे हक्क गुंतलेले आहेत. सदर कामी झालेला नो डब्ल्यु एस चा हूकूम रद्द न झाल्यास प्रतिवादी यांचे फार मोठे नुकसान होणार असून त्यांचे असलेले कायदेशीर हक्क ही धोक्यात येणार आहे. कैफियत रेकॉर्डवर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, कैफियत देणेस झालेला विलंब माफ करुन प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला 'नो डब्ल्यु एस' चा आदेश रद्द करण्यात यावा व कैफियत रेकॉर्डवर घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** वादी यांनी प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दिले असून प्रस्तुत अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी यांनी कोणतेही सबळ व संयुक्तीक कारण दिलेले नाही. निव्वळ सदरचे काम लांबवणेकामी उशीरा कैफियत दाखल करणेकरीता सदरचा अर्ज दिला आहे. करीता, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** प्रस्तुत प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यातील सर्व कागदपत्रे बारकाईने पाहिले. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता, हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाईकरीता

दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दि.०३/०८/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ यांना प्रस्तुत दाव्याचे समन्स व नोटीस प्राप्त झाल्या व ते दावेकामी दि.१०/०८/२०२२ रोजी हजर झाले. प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ यांनी समन्स प्राप्त झालेपासून ९० दिवसांमध्ये कैफियत दाखल केली नाही म्हणून प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द दि.२४/११/२०२२ रोजी ''विना कैफियत व म्हणणे'' असा आदेश पारीत करण्यात आला. प्रस्तुत प्रतिवादी यांनी विलंबाचे दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. अर्जामध्ये नमूद केलेले कारण संयुक्तीक नसले तरी दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना संधी देणे न्यायसंगत वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल, तरी न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत प्रतिवादींना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतात. करिता खालील आदेश–

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.१८) हा रु.५००/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ यांची लेखी कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2022.12.15 18:22:07 +0530

दि.१५/१२/२०२२ **(रोहिणी अ. जाधव)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर.